महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा
महाराष्ट्र राज्य, नाशिक विभाग, नाशिक
दुसरा मजला आयुक्तालय, महसूल प्रशासकीय इमारत,
आय.एस.पी. समोर नाशिक रोड, ४२२१०१.
फोन नं.- ०२५३-२४५३५५४
फॅक्स नं.- ०२५३-२४५३४८३
e mail- ddgsdansk@yahoo.co.in

जा.क्रं.आस्था/गट-क/नामनिर्देशन/२५५४ /२०१३ दिनांक- १८.१२.२०१३

# जाहिरात

उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य, नाशिक विभाग, नाशिक यांचे आस्थापनेवरील गट-क संवर्गातील नामनिर्देशनाने रिक्त पदे भरण्यासाठी खाली नमूद केलेल्या प्रवर्गातील शैक्षणीक अर्हता धारण करणा-या उमेदवाराकडून या जाहिरातीव्दारे विहित नमुन्यातील अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्रं. | प्रवर्ग | एकूण रिक्त पदे | समांतर आरक्षण | | | | | | समांतर आरक्षणा शिवाय भरावयाची पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला | माजी सैनिक | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | अंशकालीन पदवीधर/ पदविकाधारक | खेळाडू | |
| **(१) सर्वेक्षक (२ पदे)** | | | | | | **(वेतनबँड रु.५२००-२०२०० ग्रेड-पे २४००)** | | | |
| १ | खुला | २ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० |
| | **एकूण :-** | २ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० |
| **(२)भौगोलिक माहिती प्रणाली वरिष्ठ सहाय्यक (१ पद)** | | | | | | **(वेतनबँड रु.५२००-२०२०० ग्रेड-पे २८००)** | | | |
| १ | खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | **एकूण :-** | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| **(३)भौगोलिक माहिती प्रणाली सहाय्यक (७ पदे )** | | | | | | **(वेतनबँड रु.५२००-२०२०० ग्रेड-पे २०००)** | | | |
| १ | अनु.जाती | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २ | अनु.जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ३ | वि.जा./भ.ज. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ४ | वि.मा.प्र. | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० |
| ५ | खुला | ३ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ |
| | **एकूण :-** | ७ | २ | १ | ० | ० | १ | ० | ३ |
| **(४)वरिष्ठ लिपिक (१ पद )** | | | | | | **(वेतनबँड रु.५२००-२०२०० ग्रेड-पे २४००)** | | | |
| १ | अनु.जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | **एकूण :-** | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| **(५)कनिष्ठ लिपिक (२ पदे)** | | | | | | **(वेतनबँड रु.५२००-२०२०० ग्रेड-पे १९००)** | | | |
| १ | अनु.जमाती | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २ | इ.मा.व. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | **एकूण** | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ |

**१. महिला, माजी सैनिक व अंशकालीन आरक्षित पदे ही संबधित सामाजिक प्रर्वगातून भरावयाच्या एकूण पदसंख्येपैंकी असतील.**

**२. अर्ज स्विकारण्याची अंतिम तारिख २४/०१/२०१४ रोजी सांयकाळी ५.४५ वाजेपर्यंत आहे.**

**पदनिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता :-**

| अ.क्रं. | पदाचे नांव | आवश्यक शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | सर्वेक्षक | १)माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (S.S.C.)उत्तीर्ण **किंवा** शासनमान्य समकक्ष परिक्षा उत्तीर्ण<br>२)शासनाचे तंत्रशिक्षण मंडळाचे स्थापत्य अभियांत्रिकी पदविका प्रमाणपत्र (DCE). **किंवा** औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे (ITI) Surveying चे शासनमान्य संस्थेचे प्रमाणपत्र प्राप्त.<br>३)Preference will be given to the candidates who have experience in plain table, chain compass & Theodolite surveys, in plotting and preparation of survey maps leveling and plotting contours & traversing. |
| २ | भौगोलिक माहिती प्रणाली वरिष्ठ सहाय्यक | संविधानीक विद्यापीठाची स्थापत्य (Civil)/यांत्रिकी (Machanical)/विद्युत (Electrical)पदवी **किंवा** शासनाचे तंत्रशिक्षण मंडळाचे स्थापत्य (Civil)/ यांत्रिकी (Machanical)/विद्युत (Electrical) पदविका प्रमाणपत्र. |
| ३ | भौगोलिक माहिती प्रणाली सहाय्यक | १)माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (S.S.C.)उत्तीर्ण **किंवा** शासनमान्य समकक्ष परिक्षा उत्तीर्ण.<br>२) इंटरमिडिएट ग्रेड चित्रकला (ड्राईंग) परिक्षा उत्तीर्ण **किंवा** शासनमान्य समकक्ष परीक्षा उत्तीर्ण. |
| ४ | वरिष्ठ लिपिक | संविधानीक विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी. |
| ५ | कनिष्ठ लिपीक | १) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (S.S.C.)उत्तीर्ण **किंवा** शासनमान्य समकक्ष परिक्षा उत्तीर्ण<br>२) टंकलेखनाची शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र इंग्रजी ४० शब्द प्रति मिनीट **किंवा** मराठी ३० शब्द प्रति मिनीट उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |

**टिप :-** १. शासन परिपत्रक सा.प्र.वि. दिनांक १९ सप्टेंबर २०१३ नुसार पदवीधर/पदवीकाधारक अंशकालीन उमेदवारांकरिता आरक्षित पदासाठी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या संबधित सामाजिक प्रवर्गातील उमेदवारामधून पद भरण्यांत येईल. त्यामुळे अशा पदांचा विचार करुन सदर प्रवर्गातील उमेदवारांनी अर्ज करावेत.

२. शासन निर्णय सा.प.वि. दि २०/७/२००२ व तदनंतर त्या अनुषंगीक सुधारित शासन आदेशान्वये उपरोक्त पदांसाठी अर्ज करणा-या उमेदवारांनी संगणक हाताळणी/ वापराबाबतचे खालील परीक्षा प्रमाणपत्र उमेदवारांनी नियुक्तिपासून दोन वर्षाचे आत प्राप्त करावे लागेल अन्यथा सेवा समाप्त होईल.

अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा

ब) महाराष्ट्र राज्य, उच्च तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

३. महाराष्ट्र राज्य लोकसेवा (मागासवर्गीयांसाठी आरक्षण) अधिनियम-२००१ मधील कलम ४ (३) नुसार विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती(ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) या प्रवर्गासाठी विहीत केलेले आरक्षण अंतर्गत परिवर्तनीय आहे.

## वयोमर्यादा :-

- उमेदवाराचे वय **दिनांक ०१/०१/२०१४** रोजी **किमान १८ वर्षे व कमाल ३३ वर्षापेक्षा जास्त** नसावे **(मागासवर्गीयांसाठी ५ वर्षाची शिथीलता)**
- माजी सैनिकांसाठी त्यांनी सशस्त्र दलात केलेल्या सेवेइतका कालावधी अधिक तीन वर्ष इतकी वयोमर्यादा राहील. मात्र कमाल **वयोमर्यादा ४५ वर्षे राहील.**
- स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी व सन १९९४ चे नंतरचे निवडणूक कर्मचारी या घटकातील उमेदवारांना शासन निर्णयातील तरतूदीनुसार उच्चतम वयोमर्यादा **४५ वर्षे इतकी राहील.**
- **पदवीधर अंशकालीन** उमेदवारांसाठी ३ वर्षे अंशकालीन काम केलेल्या उमेदवारांना शा.निर्णयातील तरतूदीनुसार कमाल **वयोमर्यादा ४५ वर्षे राहील.**
- **प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त** उमेदवारासाठी शासन निर्णयातील तरतूदीनुसार कमाल **वयोमर्यादा ४५ वर्षे राहील.**
- अपंग उमेदवारांना ४५ वर्षे वयोमर्यादा राहील.
- खेळाडू उमेदवारांसाठी गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन सदर पदासाठी असलेल्या वयोमर्यादते ५ वर्षाचे वयाची अट शिथील.

## सर्वसाधारण अटी व शर्ती :-

१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. तथापी महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रं.मकसी-१००७/प्र.क्रं.३६/का.३६ दि.१० जूलै २००८ नुसार महाराष्ट्र-कर्नाटक सिमा भागातील दावा केलेल्या ८६५ गांवातील १५ वर्षापासून रहीवासी असल्याचा त्यांच्या वास्तव्यांचा सक्षम प्राधिका-यांचा विहीत नमुन्यातील दाखला सादर करणे अनिवार्य राहील.

२. उक्त पदांसाठी आवश्यक अर्हता प्राप्त करणा-या संपुर्ण महाराष्ट्र राज्यातील कोणताही उमेदवार अर्ज करु शकेल

३. मागासवर्गीय उमेदवारांनी नजीकचे कालावधीतील सक्षम अधिकारी (उप जिल्हाधिकारी दर्जाचे अधिकारी) यांनी दिलेले जात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. निवड होणा-या मागासवर्गीय घटकातील उमेदवारांना जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कडून सहा महिन्याचे आत वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

४. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास वर्ग, यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ ( सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दि. २९ जानेवारी, २००४ पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमिलिअर तत्व) वि.जा. (अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे नॉन क्रिमिलिअर प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

५. म.शासन सामान्य प्रशासन परिपत्रक दि. १/७/२००५ नुसार महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन ) नियम २००५ नुसार सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात प्रतिज्ञापत्र देणे आवश्यक आहे.

६. उमेदवारांनी उक्त पदांसाठी आवश्यक अर्हतेनुसार शैक्षणीक प्रमाणपत्रे, संगणक हाताळणी अर्हता प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, इत्यादीच्या सांक्षांकीत प्रति अर्जासोबत जोडाव्यात मूळ प्रती जोडू नयेत.

७. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी केली असल्यास नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकीत छायाप्रत जोडावी.

८. शासकीय / निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या विभाग प्रमुखांच्या परवानगीने भरावे व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी.

९. एक अथवा सर्व अर्ज नाकारण्याचा, निवड प्रक्रियेत वेळेवर होणारा बदल तसेच अंतीम निर्णय इत्यादी बाबतचे संपूर्ण अधिकार नियुक्ती अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.

१०. परीक्षेचा प्रकार, पदांची सख्या, समातर आरक्षण याबाबत बदल करणे, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशत: बदल करणे, न्यायालयीन स्थगिती / निवाडा किंवा शासन निर्णयामुळे निवड प्रक्रीया कुठल्याही स्तरावर स्थगित / रद्द करण्याचे अधिकार निवड समितीला राहतील.याबाबतचा कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

११. माजी सैनिक उमेदवाराने जिल्हा सैनिक बोर्डात नांव नोदणी केली असल्यास प्रमाणपत्राची छायांकित प्रत साक्षांकीत करुन अर्जासोबत जोडावी.

१२. पदवीधर/पदवीधारक/अंशकालीन या समांतर आरक्षणाचा लाभ घेऊन इच्छिणा-या उमेदवारांनी सुशिक्षित बेरोजगार या योजेनेतंर्गत शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षे काम केल्याचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र व रोजगार मार्गदर्शक केंद्रामध्ये या अनुभवाचे नोंद केल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

**महिला उमेदवारा करिता :-**

१. खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/कुटूंबातील (क्रीमीलेअर) महिला सदस्यांना महिलासाठी असलेले ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, वि.जा. (अ), भ.ज. (ब), (क), (ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातील महिला सदस्यांना महिलाचे ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहाणार नाही.

२. मागासवर्ग प्रवर्गातील इतर मागासवर्ग, वि.जा.(अ), भ.ज. (ब), (क), (ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटात मोडत नसलेल्या महिला सदस्यांनी महिलाच्या ३० टक्के आरक्षणा साठी क्रिमीलेअर मध्ये मोडत नसल्याचे प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत अर्जासोबत जोडावी व मुळ प्रमाणपत्र अंतीम निवडीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.

३. महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बालविकास विभाग क्र.८२/२००१/मसेआ २०००/प्र.क्र. ४१५/ का २ दि. २५/०५/२००१ मधील तरतुदीनुसार राहील. आणि तदनंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**माजी सैनिक उमेदवारा करिता :-**

१. शा. सा.प्र. विभाग परिपत्रक दि. १०/१०/८० व दि. १६/४/८१ नुसार माजी सैनिक म्हणुन शासन सेवेकरीता पात्र उमेदवार असावा.

२. शासन सा.प्र. विभाग निर्णय क्रं.आरटीए-१०९०/२२/प्रक्र६/९३-१२ दि. ८/६/१९९३ मधील तरतुदीनुसार माजी सैनिक उमेदवाराने माजी सैनिक या समांतर घटकांच्या आरक्षणाचा पुर्वी लाभ घेवुन शासकीय सेवेत नोकरी स्विकारली असेल तर त्यास पुन्हा समांतर आरक्षणाचे लाभास पात्र रहाणार नाही तो केवळ वयाची सवलत घेण्यास पात्र राहील.

**खेळाडू उमेदवारांसाठी :-**

१. सदर खेळाडूने सेवा प्रवेश नियमातील तरतूदीनुसार पदांसाठी आवश्यक असलेली किमान शैक्षणिक अर्हता व इतर अर्हता प्राप्त केलेली असावी.

२. खेळाडूनी त्या-त्या खेळांच्या वैयक्तीक अथवा सांघीक क्रीडा स्पर्धामध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम, द्बितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य अथवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू. राज्य अजिंक्य पद स्पर्धा या सदर खेळाच्या महाराष्ट्र ऑलिपींक असोसीएशनसी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेचे आयोजित केलेल्या असाव्यात. वैयक्तीकरित्या किंवा आमंत्रीत स्वरुपाच्या स्पर्धामध्ये भाग घेतलेल्या खेळाडूंचा यासाठी विचार करता येणार नाही.

३. खेळाडूकडील प्रमाणपत्र क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शा.निर्णयातील मार्गदर्शन सूचनानुसार आहे किंवा नाही याची तपासणी झाल्यानंतरच पात्र उमेदवारानांच नियुक्ती देण्यात येईल.

**परीक्षेचे स्वरुप व निवड पध्दत :-**

१. **सर्वेक्षक पदासाठी** शासन सामान्य प्रशासन विभागाकडील निर्णय क्र. प्रनि.म.२००७/प्र.क्र ४६/०७/१३/अ दिनांक १९/१०/२००७ व दिनांक २७/०६/२००८ मधील तरतुदीनुसार, लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, अंकगणित व चालू घडामोडी या विषयावरील प्रश्नांकरिता १२० गुणाची लेखी परीक्षा घेण्यात येईल, जे उमेदवार लेखी परीक्षेत किमान ४५ % गुण प्राप्त करतील अशा उमेदवारांची ८० गुणांची व्यावसायिक चाचणी घेण्यात येईल. मुलाखती न घेता एकूण प्राप्त केलेल्या गुणाच्या आधारावर निवड करण्यात येईल. लेखी परीक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल. लेखी परिक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाची असेल.

२. **भौगोलिक माहिती प्रणाली वरिष्ठ सहाय्यक पदासाठी** शासन निर्णय सा.प्र.वि. दिनांक १९/१०/२००७ व दिनांक २७/०६/२००८ मधील तरतुदीनुसार लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, अंकगणित व चालू घडामोडी या विषयावरील प्रश्नांकरिता १२० गुणाची लेखी परीक्षा घेण्यात येईल, जे उमेदवार लेखी परीक्षेत किमान ४५ % गुण प्राप्त करतील अशा उमेदवारांची ८० गुणांची व्यावसायिक चाचणी घेण्यात येईल. मुलाखती न घेता एकूण प्राप्त केलेल्या गुणाच्या आधारावर निवड करण्यात येईल. लेखी परीक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल. लेखी परिक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल.

३. **भौगोलिक माहिती प्रणाली सहाय्यक पदासाठी** शासन निर्णय सा.प्र.वि. दिनांक १९/१०/२००७ व दिनांक २७/०६/२००८ मधील तरतुदीनुसार लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, अंकगणित व चालू घडामोडी या विषयावरील प्रश्नांकरिता १२० गुणाची लेखी परीक्षा घेण्यात येईल, जे उमेदवार लेखी परीक्षेत किमान ४५ % गुण प्राप्त करतील अशा उमेदवारांची ८० गुणांची व्यावसायिक चाचणी घेण्यात येईल. मुलाखती न घेता एकूण प्राप्त केलेल्या गुणाच्या आधारावर निवड करण्यात येईल. लेखी परीक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल. लेखी परिक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल.

४. **वरिष्ठ लिपीक** पदासाठी लेखी परीक्षेचा दर्जा पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान अंकगणित व चालू घडामोडी या विषयावरील प्रश्नांकरिता एकूण २०० गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल. सदरील लेखी परिक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल. लेखी परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणाच्या आधारावर निवड करण्यात येईल.

५. **कनिष्ठ लिपीक पदासाठी** शासन निर्णय सा.प्र.वि. दिनांक १९/१०/२००७ व २७/०६/२००८ मधील तरतुदीनुसार लिपीक पदासाठी लेखी परीक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल. मुलाखती न घेता लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, अंकगणित व चालू घडामोडी या विषयावरील प्रश्नांकरिता २०० गुणाची लेखी परीक्षा घेण्यात येईल. एकूण प्राप्त केलेल्या गुणाच्या आधारावर निवड करण्यात येईल. लेखी परिक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल.

६. सर्व पदांच्या अंतिम निवडीसाठी उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधित मुळ प्रमाणपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करुन दयावी लागतील अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

७. उमेदवारांस समान गुण मिळाल्यास परीक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता क्रम सामान्य प्रशासन शासन निर्णय दि.२७ जून, २००८ मधील नमूद निकषावर क्रम लावला जाईल.

**अर्ज कसा करावा:-**

१. प्रत्येक पदासाठी वेगवेगळा अर्ज करणे व त्यासोबत त्याप्रमाणे शुल्क व कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. उपरोक्त पदांसाठी लेखी परीक्षा एकाच दिवशी एकाच वेळी घेण्यात येईल ही बाब विचारात घेऊन उमेदवारानी वर नमूद रिक्त पदांसाठी अर्ज करावेत.

२. उमेदवाराने सोबत दिलेल्या विहीत नमुन्यात ३०.से.मी. बाय २० से.मी. आकाराच्या पांढ-या जाड कागदावर एकाच बाजूला हस्तलिखीत/टंकलिखीत/संगणीकृत वा चक्रमुद्रीत करुन अर्ज करावा. उमेदवाराची अर्जातील माहिती/तपशील सुस्पष्टपणे नमूद करावा. उमेदवाराने ओळखपत्रावरील छायाचित्राच्या आकाराचे त्याचे अलीकडीचे छायाचित्र अर्जावर विहीत जागी स्वसाक्षांकित करुन घट्ट चिकटवावे.

३. शैक्षणिक अर्हता व संगणक अर्हता प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडाव्यात.

४. उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमी लेअर) चे तत्व अनुसूचित जाती/जमाती व्यतिरिक्त इतर सर्व मागास प्रवर्गाला लागू असल्याने उन्नत/प्रगत गटात मोडत नसल्याचे सन २०१२-२०१३ या वर्षातील नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडावी.

५. जात प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडावी.

६. समांतर आरक्षणातील उमेदवारांनी (महिला, माजी सैनिक, अंशकालीन, इ.) समांतर आरक्षणाच्या संबंधित प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडावी.

७. अर्जाच्या पाकीटावर पदाचे नाव सामाजिक (मागासवर्ग) आरक्षणानुसार प्रवर्ग नमूद करावा.

८. अर्जासोबत विहित प्रवेशपत्रामध्ये माहिती भरुन स्वसांक्षाकित फोटो चिकटवावा व अर्जासोबतच जोडावे.

९. अर्जासोबत स्वत:चे नाव व पत्ता नमूद केलेला २४ से.मी. बाय ११ से.मी. आकराचा रु. १० चे पोष्टाचे तिकीट लावलेला लिफाफा जोडावा.

१०. विहीत नमुन्यात नसलेले अर्ज, विहीत शुल्कात नसलेले अर्ज, विहीत पात्रता धारण न करणा-या उमेदवाराचे अर्ज, अपूर्ण किंवा चुकीचे अर्ज, फोटो नसलेला व फोटो स्वसाक्षांकित न केलेला अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता, जातीचा दाखला, नॉन क्रिमी लेअरचे प्रमाणपत्र साक्षांकित प्रत न जोडलेले अर्ज, विहीत मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज, लहान कुटुंबाचे शपथपत्र न जोडलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

११. अंतिम निवड होईपर्यंत उमेदवाराची उमेदवारी ही सशर्त (Conditional) राहील व कोणताही टप्प्यावर उमेदवार अपात्र आढळून आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

१२. उमेदवाराचे लेखी परीक्षेचे ठिकाण, परीक्षेचा दिवस आणि वेळ स्वतंत्र्यरित्या प्रवेशपत्राव्दारे पोस्टाने कळविण्यात येईल. मात्र पोस्टाच्या विलंबास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१३. काही प्रशासकीय अथवा तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास निवड प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर स्थगित किंवा रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार निवड समितीस राहील.

१४. उमेदवाराने उमेदवारीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविण्यात येईल.

१५. अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परीक्षेस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

१६. परिक्षेसाठी येण्याजाण्याचा खर्च उमेदवारास स्वत: करावा लागेल.

१७. संबधीत कुठल्याही न्यायालयीन कामकाजासाठी नाशिक न्यायालयीन अंमलाखाली राहील

१८. वरील पदावर शासन सेवेत नियुक्त होणा-या उमेदवारासं यंत्रणेच्या नाशिक विभागातील जिल्हा कार्यालयात/विभागीय कार्यालयामध्ये काम करावे लागेल.

**परीक्षा शुल्क (फी) :-**

१. अर्जासोबत **खुला प्रवर्गातील उमेदवाराने- रुपये. २००/-, राखीव प्रवर्गातील उमेदवाराने- रुपये. १००/-** परीक्षा शुल्क स्वरुपात शुल्क (फि) महाराष्ट्र राज्याचे न्यायालयीन मुद्रांक शुल्क स्वरूपात (कोर्ट फी स्टॅम्प ) अर्जाला जोडणे आवश्यक आहे. अर्जदाराला कोर्ट फी स्टॅम्प मिळविणे शक्य नसेल तर त्यांनी रेखांकित भारतीय पोस्टल ऑर्डरव्दारे आवेधन शुल्क भरणे आवश्यक आहे. अर्जासोबत स्टॅम्प पेपर जोडू नयेत. इतर कोणत्याही स्वरुपात शुल्क (फी) स्विकारली जाणार नाही. भारतीय पोस्टल ऑर्डर **उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, नाशिक विभाग नाशिक** यांचे नांवे असणे आवश्यक राहील. भारतीय पोस्टल ऑर्डर वरील नावाने नसेल तर अर्ज विचारात घेतला जाणार नाही व विनाशुल्क भरलेले अर्ज रद्द ठरविण्यात येतील आणि त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. तसेच एकदा भरलेले परीक्षा शुल्क कोणत्याही सबबीवर परत केले जाणार नाही.

२. **माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागू राहाणार नाही.** मात्र त्यासाठी त्यांनी सैनिकी सेवेचा पदावधी पुर्ण केल्याचे व कार्यमुक्त पत्राची साक्षांकीत प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.

**अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक व कार्यालयाचा पत्ता :-**

उमेदवाराने संपूर्ण भरलेला अर्ज वरील आवश्यक साक्षांकित प्रमाणपत्राच्या प्रतीसह बंद लिफाफा उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा , नाशिक विभाग, नाशिक, दुसरा मजला आयुक्तालय, महसूल प्रशासकीय इमारत, आय.एस.पी. समोर नाशिक रोड, ४२२१०१. या पत्त्यावर दिनांक २४/०१/२०१४ रोजी सायंकाळी ५.४५ मिनिटापर्यंत पोहचतील अशा बेताने समक्ष अथवा पोस्टाने पाठवावे. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. पोष्टाच्या विलंबास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही तसेच यासंबधाने उमेदवारा समवेत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. टपालाव्दारे विलंबाने प्राप्त झालेले लिफाफे उघडले जाणार नाहीत.

दिनांक :- १८.१२.२०१३

ठिकाण :- नाशिक

सही/-

**( का.च. वानखेडे)**

**उपसंचालक**

**तथा अध्यक्ष निवड समिती**

**भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा**

**नाशिक विभाग नाशिक**

कोर्ट फी स्टँप

**टिप -** अर्जदाराने अर्जातील सर्व माहिती भरणे आवश्यक आहे. या जाहिरातीतील विहित नमुन्यात नसलेले अर्ज, अपूर्ण माहिती भरलेले अर्ज, विहित रकमेची इंडियन पोस्टल ऑर्डर / कोर्ट फी स्टँप न जोडलेले अर्ज व विलंबाने प्राप्त झालेले अर्ज अपात्र ठरविण्यात येतील.

## अर्जाचा नमुना

| फक्त कार्यालयीन उपयोगाकरिता | |
|---|---|
| अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक | |
| जातीचा प्रवर्ग | |

ज्या पदासाठी अर्ज केलेला
आहे त्या पदाचे नांव व प्रवर्ग :-

उमेदवाराचा अलीकडे काढलेला स्वस्वाक्षांकित फोटो.

प्रति,
मा. उपसंचालक
तथा अध्यक्ष निवड समिती,
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
नाशिक विभाग,नाशिक.

आपले कार्यालयाची जाहीरात दिनांक / /२०१३ ला अनुसरुन ----------- या पदासाठी अर्ज करित असून माझा तपशील खालील प्रमाणे आहे.

१. उमेदवाराचे संपूर्ण नांव (मराठीमध्ये) :- आडनाव :-
स्वत:चे नाव :-
वडिलाचे /पतीचे नाव :-

२. लिंग (पुरुष/स्त्री) :-

३. आईचे नाव :-

४. जन्मतारीख :-
( दि. ०१/०१/ २०१४ रोजी) वय:-वर्ष महिने दिवस

५. संपूर्ण पत्ता :- ------------------------------------------
------------------------------------------
------------------------------------------

संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक (STD कोडसहीत) :- ----------------------------------------

अथवा भ्रमणदूरध्वनी क्रमांक :- ----------------------------------------

असल्यास ईमेल आयडी क्र. ----------------------------------------

६. अ) (अ) जात --------------- जातीचा प्रवर्ग ---------------------

(ब) जातीचा प्रवर्ग (योग्य तेथे √ अशी खूण करावी.)

| अनु.जाती | अनु.जमाती | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

७. अर्ज कोणत्या जातीच्या प्रवर्गासाठी केला आहे ------------------
(प्रवर्ग स्पष्ट अक्षरात नमूद करावा)
उन्नत व प्रगत (क्रिमिलेअर) गटात समाविष्ट असणा-या भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र. व इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांनी खुला प्रवर्ग नमूद करावा.

८. अर्जदार विवाहित / अविवाहित √ अशी खूण करावी.

| विवाहित | अविवाहित |
|---|---|
| | |

९. राष्ट्रीयत्व:-

१०. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी आहे काय? ( होय / नाही )

११. अ) अर्जदार माजी सैनिक आहे काय ? ( होय / नाही )
ब) अर्जदार प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त आहे काय ? ( होय / नाही )
क) अर्जदार अपंग आहे काय ? ( होय / नाही )
ड) अर्जदार अंशकालीन आहे काय ? ( होय / नाही )

१२. अर्जदार समांतर आरक्षणातील असल्यास त्याचा प्रकार :- --------
व सोबत प्रमाणपत्र जोडले आहे काय ? ( होय / नाही )

१३. शैक्षणिक / तांत्रिक पात्रता

| शैक्षणिक पात्रता | मंडळ / विद्यापिठ | उत्तीर्ण वर्ष | विषय | गुणांची टक्केवारी | अर्जासोबत सत्यप्रत जोडली असल्यास √ अशी खूण करावी. |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

१४. अनुभव

| अ.क्र. | काम केलेली संस्था व तीचा पत्ता | कामाचा कालावधी<br>पासून | पर्यन्त | पदाचे नांव व वेतनश्रेणी | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

१५.नोकरीसाठी शासनाचे अधिकृत कार्यालयाकडे नोंदणी क्रमांक ---------------------------

१६. सोबत परीक्षा शुल्क रक्कम रु. --------- चे आय.पी.ओ./कोर्ट फी स्टॅम्प स्वरुपात जोडले आहे.

१७. असल्यास इतर तपशील :-------------------------------------------------------------------

**-:: प्रतिज्ञापन ::-**

मी असे प्रमाणित करतो / करते की प्रस्तुत पदाची जाहिरात / अधिसूचना वाचली असून त्यातील पदविषयक माहिती मी काळजीपूर्वक वाचली आहे, व मला ती मान्य आहे. सदर परीक्षेस प्रवेश मिळण्यासाठी अधिसूचनेत नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तींची मी पूर्तता करतो / करते याची मी खात्री केली आहे. या अर्जात दिलेली माहिती माझ्या माहिती प्रमाणे बरोबर व खरी आहे. तसेच अर्जात दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास त्याच माहितीच्या आधारे मला दिलेला प्रवेश रद्द होईल आणि मिळालेली नोकरी गमावण्यास मी बांधील राहीन व पुढील योग्य त्या कारवाईस पात्र राहीन याची मला जाणीव आहे.

**दिनांक :**

**स्थळ :** **उमेदवाराची स्वाक्षरी.**

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम, २००५ नुसार**

**अर्जासोबत जोडावयाच्या लहान कुटूंबाच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना अ (नियम ४)**

**प्रतिज्ञापत्र**

मी, श्री./श्रीमती. ----------------------------------- श्री. ----------------- यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी वय ------------ वर्ष राहणार --------------------------------------------- याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

१. मी -------------------------------------- या पदासाठी माझ्रा अर्ज दाखल केला आहे.

२. आज रोजी मला -------------(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दि. २८ मार्च, २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ------ आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा.)

३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा जास्त असेल तर दिनांक २८ मार्च, २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनिवार्ह ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.

**दिनांक -**

**ठिकाण:-** **(उमेदवाराची स्वाक्षरी)**

उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा
महाराष्ट्र राज्य, नाशिक विभाग, नाशिक
दुसरा मजला आयुक्तालय, महसूल प्रशासकीय इमारत,
आय.एस.पी. समोर नाशिक रोड
Tel- ०२५३-२४५३५५४ e.mail- ddgsdansk@yahoo.co.in Fax- ०२५३-२४५३४८३

**- प्रवेश प्रमाणपत्र -**

| बैठक क्रमांक |
| --- |
| |

प्रति,

--------------------------------
--------------------------------
--------------------------------
--------------------------------

| उमेदवाराचे स्वसाक्षांकित छायाचित्र |
| --- |
| |

पदाचे नांव :- ----------------------------

पदाचा प्रवर्ग:- ----------------------------

उपसंचालक
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
नाशिक विभाग,नाशिक

**उमेदवारांना सूचना:-**

१. परीक्षेचा दिनांक, परीक्षेची वेळ, परीक्षेचे ठिकाण सदर प्रवेशपत्राद्वारे नंतर कळविण्यात येईल. या प्रवेशपत्रामधील प्रति, पदाचे नाव, पदाचा प्रवर्ग ही माहिती उमेदवाराने भरावी व अर्जावरील छायाचित्रासारखेच स्वसाक्षांकित छायाचित्र वर दर्शविलेल्या ठिकाणी चिकटवावे.

२. परीक्षा कक्षात प्रवेश मिळविण्यासाठी हे प्रवेश प्रमाणपत्र परीक्षेच्या वेळी सोबत आणणे आवश्यक आहे. परीक्षेनंतर प्रस्तुत प्रवेश प्रमाणपत्र स्वत:जवळ जपवून ठेवावे.

३. परीक्षेसाठी विहीत वेळेपूर्वी अर्धा तास आधी परीक्षा कक्षात हजर राहणे आवश्यक आहे.

४. परीक्षा सुरु झाल्यानंतर परीक्षा कालावधी संपेपर्यंत कोणत्याही उमेदवारास कोणत्याही कारणासाठी परीक्षा कक्षाबाहेर जाण्याची परवानगी दिली जाणार नाही.

५. मोबाईलफोन, पेजर, कॅल्क्यूलेटर,डिजिटल डायरी इत्यादी सारखी दूरसंचार साधने परिक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास व स्वत:जवळ बाळगण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य आणले तर उमेदवारांना ते परीक्षा केंद्राच्या बाहेर ठेवावे लागेल व अशा साधनांच्या सुरक्षिततेची व्यवस्था कार्यालयाकडून केली जाणार नाही.

६. कोणतीही अनाधिकृत वस्तू, पुस्तके किंवा वहया तसेच बॅगस् इ. सामान परीक्षा कक्षात स्वत:जवळ ठेवू नये.
७. परीक्षेस प्रवेश दिला म्हणून कार्यालयाने उमेदवारी स्विकारली, असा अर्थ होत नाही. उमेदवार कोणत्याही टप्प्यावर अपात्र असल्याचे आढळून आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.
८. परिक्षेस उपस्थित राहणा-या उमेदवारास भत्ता व प्रवास भत्ता देय रहाणार नाही.
९. परीक्षासंबधी तसेच इतर सर्व सूचना परीक्षा केंद्राच्या बोर्डवर लावण्यात येतील त्या संबधित उमेदवाराने काळजीपूर्वक वाचन करावे.
१०. अर्जामध्ये केलेल्या विविध दाव्यांस अनुसरुन कोणत्याही टप्प्यावर मुळ प्रमाणपत्रावरुन पात्रता तपासण्याच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात परीक्षेस प्रवेश देण्यात येत आहे. अर्जामधील दाव्यानुसार कोणत्याही टप्प्यावर सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे पात्रता आढळून न आल्यास संबधितांची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच, निवड समितीस चुकीची माहिती दिली, असे समजून नियमानुसार कारवाई करण्यात येईल.
११. परीक्षा कक्षात आणण्यास परवानगी असलेले साहित्य :- प्रवेश प्रमाणपत्र, काळ्या शाईचे बॉल पाईंट पेन.
१२. परीक्षेच्या वेळी हजेरीपटावरील नोंदी काळजीपूर्वक भराव्यात. हजेरीपटावर केलेली स्वाक्षरी परीक्षेच्या अर्जावर व उत्तरपत्रिकेवर केलेल्या स्वाक्षरीशी जुळणारी असावी.
१३. परीक्षा कालावधी पूर्ण होण्यास ५ मिनिटे असतांना इशारा घंटा दिली जाईल. त्यानंतर पेपर संपण्याची अंतिम घंटा झाल्यावर उत्तरे लिहीणे लगेच थांबविले पाहीजे. आपली उत्तरपत्रिका परीक्षा कालावधी संपल्यानंतर लगेचच समवेक्षकाच्या ताब्यात द्यावी. तसेच सर्व उमेदवारांच्या उत्तरपत्रिका समवेक्षकांनी गोळा केल्यावर मोजून त्याचा हिशोब लागेपर्यंत संबधितांनी आपापल्या जागेवर बसावे.
१४. प्रवेश प्रमाणपत्राच्या सुरक्षिततेची संपूर्ण जबाबदारी संबधित उमेदवारावरच राहील. अन्य व्यक्तीकडून कोणत्याही कारणाकरिता सदर प्रवेश प्रमाणपत्राचा दूरपयोग केला गेला, तर त्या व्यक्तीकडून मदत घेतली नसल्याचे सिध्द करण्याची जबाबदारी उमेदवारावर राहील.
१५. परवानगी शिवाय कोणत्याही परिस्थितीत लेखणिकाची मदत घेता येणार नाही.